# ओळखपत्राबाबत घोषणा

आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांकरिता परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्रासोबत त्यांचे स्वत:चे ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत आणण्याचे धोरण ठरविले आहे. त्यानुसार आयोगाच्या वेबसाईटवर दिनांक २४ जून, २०१५ रोजी घोषणा प्रसिध्द केली आहे. प्रत्येक परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर, परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे, अशा स्पष्ट सूचना उमेदवारांना देण्यात येते.

**२.** आयोगाच्या स्पष्ट सूचना असूनही आयोगामार्फत दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या लिपिक टंकलेखक परीक्षा २०१५ करिता काही उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबत ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सादर केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

**३.** प्रस्तुत लिपिक टंकलेखक परीक्षा २०१५ तसेच यापूर्वी जुलै, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत झालेल्या सर्व परीक्षांकरिता **परीक्षेच्या वेळी ओळखीचा पुरावा सादर न केलेल्या उमेदवारांनी** स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत **स्वस्वाक्षांकित करुन, उपसचिव परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ७ वा मजला, कूपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई – ४०००२१** यांच्याकडे दिनांक **१० नोव्हेंबर, २०१५** पर्यत, सादर करावी.

**४.** वरीलप्रमाणे ओळखीचा पुरावा सादर करताना ओळखपत्राच्या छायांकित प्रतीवर उमेदवाराने स्वत:चे नाव, परीक्षेचे नाव व दिनांक आणि बैठक क्रमांक नमूद करावा.

सुचिता ज.परब<br>उप सचिव,परीक्षा पूर्व<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण:- मुंबई<br>दिनांक :- ३ नोव्हेंबर, २०१५